

हा दिन मराठी पंचांग व कॅलेंडरवर तो आजही छापला जातो. इथे पिढ्यान्‌पिढ्या राहून गेलेल्या बांधवांच्या सांस्कृतिक-धार्मिक एकरुपतेचे 'सिम्नतोराह' हा दिवस आजही इथल्या पंचांग व कॅलेंडरवर असणे हे ज्यू व मराठी माणसाच्या अतूट संबंधाचे द्योतक मानावयास हवे. मानवोद्धारासाठी संत अवतरतात. श्री साईनाथ जगभरातील अशांत, अस्वस्थ लोकांना शांततामय जीवनाची संजीवनी देत आहेत. त्या संजीवनीची जेरुसलेमला आज गरज आहे. जागतिक मराठी परिषद **श्री. द. म. सुकथनकर** आणि ज्यांना ज्यांना आशा असेल त्यांनी, **प्रत्येक साईनाथ भक्ताने जेरुसलेममध्ये एक शिरडी मंदिर उभारले जाण्याबाबत विचार करावा.** कारण जेरुसलेममध्ये शिरडी होणे म्हणजेच छळाकडून पुन्हा छळाकडे जाणाऱ्या इस्त्रायली बांधवांना बळाकडून बलवान करणे, शांततामार्गावर आणणे होय. नगरमधील शेतकरी इस्त्रायली शेतीमार्गदर्शनासाठी दरवर्षी इस्त्रायलमध्ये जातो. तिथले शेती विकासात्मक प्रयोग इथे येऊन यशस्वी करतो तो नगरचा - शिरडीचा शेतकरी, शिरडी कोपरगावचे पुढारी जेरुसलेममध्ये एक शिरडी व्हावी. साईबाबा मंदिर व्हावे असा विचार का करू शकत नाही ? शांती आणि संस्कृती यांची प्राप्ती हा दूरचा प्रवास असला तरी तो श्री साईबाबांच्या कृपेने प्रत्यक्षात येऊ शकतो. त्यादृष्टीने प्रयत्न झाले तर 'साईलीला' ज्यू बांधवांसाठीही धावेल. श्री साईंचा अशांत-अस्वस्थ माणसाला मन:शांती देणारा, जीवनाचा मार्ग दाखविणारा, मानवतावदाला जोडणारा शिरडी दरबार जेरुसलेममध्ये इस्त्रायलमध्ये लागला तर तिथेही शांतिवाटा उमटतील. शांती पहाट उगवेल. उजाडता दिवस शांततेचा आणि शांतिचा असावा असे जगातील प्रत्येक जीवनप्रेमी माणसाला आज वाटते. श्री साईबाबांची आणि श्री शिरडीची त्याकामी जेरुसलेमलाही निश्चित मदत होईल. शिरडीच्या आकाशात जशा तारका आहेत तशा त्या जेरुसलेमच्या नभातही आहेत. शिरडीरुपी द्वारका इस्त्रायलच्या नभांगणाखाली अवतरायला यासारखी आणखी कोणती समान आकाशस्थ पर्वणी असू शकते ?

*('दैनिक कुलाबा शिवनेर'च्या सौजन्याने)*

# श्री दत्त पुराण

— ❖ ❖ ❖ —

**ब्रह्मा-विष्णू व महेश या उत्पत्ति-स्थिती व लय देवतांचा समन्वय म्हणजे भगवान दत्तात्रेय ! दत्त जयंतीनिमित्त शिरडी संस्थानात दरवर्षी उत्सव साजरा होतो. श्री साईबाबा यांना भक्त दत्तावतार समजतात हे लक्षात घेऊन दत्त जयंतीनिमित्त श्री दत्त पुराणाचा अल्प परिचय. हा संक्षिप्त लेख वाचून वाचकांनी मूळ दत्तपुराणाकडे वळावे व ते मुळातून वाचावे ही अपेक्षा.**

— ❖ ❖ ❖ —

परमात्म्यानें जगाचा उद्धार करण्यासाठीं अत्रि ऋषींच्या घरी (श्रीदत्तात्रेय या नांवानें) अवतार धारण केला. त्यांच्या चरित्राचें वर्णन पुराणांमधून अतिशय उत्तम रितीनें करण्यांत आलेलें आहे. आणि तेंच 'साररूपानें' 'श्रीदत्तपुराण' या ग्रंथांत साडेतीन सहस्त्र ओव्यांमधून सांगण्यांत आलें आहे.

परंतु, हा 'श्रीदत्तपुराण' ग्रंथ गीर्वाण म्हणजेच संस्कृत भाषेंत असल्यामुळें सर्वसामान्य जनांना तो जाणतां येत नाहीं. ही त्याची अडचण लक्षांत घेऊन प्रस्तुत 'श्रीदत्तमाहात्म्य' या ग्रंथाची रचना मुद्दाम करण्यांत आली आहे. याच्या वाचनानें त्या स्वयंप्रभ म्हणजे स्वतःच तेजस्वी किंवा प्रकाशमान अशा भक्तवत्सल परमात्म्याचें ज्ञान होईल !

मूळच्या **'श्रीदत्तपुराण'** या ग्रंथांत ज्ञान, उपासना आणि कर्म अशीं तीन काण्डें असून त्यांतील उपासना काण्डाचा भावार्थ येथें वर्णिला आहे. त्या काण्डांत कार्तवीर्य, अर्जुन, अलर्क, आयु, यदू या दत्तभक्तांचा उद्धार कशा रितीनें झाला याचें वर्णन करण्यांत आलें असून हीं सर्व आख्यानें या प्रस्तुतच्या ग्रंथांतहि वाचावयास मिळतील.

असो. ज्यांना मुक्ति किंवा मोक्ष यांची इच्छा असेल त्यांनीं नवविधा भक्तीचें आचरण करावें. तिच्या योगें या इहलोकीं यांना भुक्ति म्हणजेच भोग किंवा ऐश्वर्य यांची प्राप्ति होऊन अंतीं अनायासे मोक्षपदाचाहि लाभ होईल !

नवविधा भक्तींत, वंदन, सख्य, पादसेवन, अर्चन, दास्य, श्रवण, कीर्तन आणि आत्मनिवेदन या नऊ प्रकारच्या भक्तींचा समावेश आहे.

कार्तवीर्य अर्जुनानें यापैकी स्मरणभक्ति आचरली, अलर्कराजानें वंदनभक्ति, आयुराजानें दास्यभक्ति, परशुरामानें सख्यभक्ति, विष्णुदत्तानें पादसेवनभक्ति, यदूनें अर्चन, वेदधर्म्यानें कीर्तन, आणि दीपकानें श्रवणभक्ति करून आपला उद्धार करून घेतला. आत्मनिवेदन या भक्तीच्या योगेंदेखील अनेक भक्तांनी श्रीदत्तचरणीं लीन होऊन निर्वाणस्थानाची, म्हणजेच मोक्षपदाची प्राप्ति करून घेतली आहे.

अशा या भक्तीचें माहात्म्य काय वर्णन करावें ? ती खरोखरच ज्ञानाची माउली असून कृपेची साउली (सांवली) आहे ! निर्गुण निराकार ब्रह्मालादेखील तिनें सगुण साकार बनविलें.

निर्गुण निराकार ईश्वराचें ध्यान करणें सामान्य जनांना शक्य नसल्यामुळें ईश्वराच्या सगुण साकार रुपाचें ध्यान करूनच त्यांनं आत्मज्ञान प्राप्त करून घेणें आवश्यक आहे. आणि यासाठींच नवविधा भक्तीची योजना आहे.

या नवविधा भक्तींतील पहिली **स्मरणभक्ति** सर्वश्रेष्ठ होय. कारण भगवंताला ती अतिशय प्रिय आहे. स्मरण म्हणजे आठवण. ज्याला सहस्त्र अंगें आहेत, सहस्त्र रूपें आहेत, जो सहस्त्र नांवांनीं ओळखला जातो, जो सहस्त्र प्रकारचीं कर्मे करतो, अशा त्या परमात्म्याचें नित्य स्मरण ठेवावें म्हणजे जीवाची कर्मबंधनांतून सुटका होऊन अनायासे मोक्षाची प्राप्ति होईल ! जातां येतां, काम करीत असतां, खातां, पितां, देतां, घेतां, थोडक्यांत म्हणजे प्रत्येक क्षणाला हृदयांत भगवंताचें स्मरण ठेवावें. म्हणजे या योगें केलेलीं कर्मे बंधनकारक होणार नाहींत आणि असें झाल्यावर साहजिकच जन्ममरणाची परंपरा संपून जीवाला मोक्षपदाचा लाभ होईल.

दुसरी **कीर्तनभक्ति**. हिच्यायोगेंदेखील भावकांचा उद्धार

होईल, 'यस्य स्मृत्या च नामोक्त्या' ही स्मृति प्रसिद्धच आहे. तप आणि यज्ञकर्म यांतील न्यून ही कीर्तन भक्ति पूर्णत्वाला नेते. अजन्म्याचें, म्हणजेच ईश्वराचें, दिव्य जन्मकीर्तन, त्याच्या दिव्य लीलांचें गायन सर्व कर्मांचा नाश करून जन्मबीजच नाहींसें करून टाकते !

भगवंताचें कीर्तन करणें म्हणजे त्याचे गुण गाणें, त्याची कीर्ति वाढविणें, त्याच्या यश, प्रताप यांचें वर्णन करणें, मात्र, हें कीर्तन मनापासून व्हायला पाहिजे. तें करताना अष्टसात्विकभाव जागृत झाले पाहिजेत. तरच जन्माला आल्याचें सार्थक, अन्यथा तें नुसतें ढोंग ठरेल ! कीर्तनाच्यावेळीं जर हृदय भरून आलें नाही, शरीरावर रोमांच उठले नाहींत, नेत्रांतून प्रेमाश्रू वाहवले नाहींत, देहभान नष्ट झालें नाहीं, अंतर्भानहि हरपलें नाहीं, तर तें कीर्तन नसून निव्वळ ढोंग होय ! कीर्तन कसें असावें हें आतां चतुर वाचकांनीं ओळखलेंच असेल !

असो. तिसरी **श्रवणभक्ति**. श्रवण करणें म्हणजे ऐकणें. ( या ठिकाणीं भगवंताचे गुण ऐकणें असा अर्थ.) भगवंताचे गुण आपल्याला ठाऊक असतात. परंतु दुसरा कुणी ते आपल्याला ऐकवूं लागला तर एकाग्र चित्ताने तें ऐकणें. ते ऐकतांना त्यावर दृढ श्रद्धा ठेवणें हाही महत्त्वाचा भाग आहे. कांहीं लोग कीर्तनाबद्दल बाह्यात्कारी मोठें प्रेम दाखवून कीर्तन ऐकण्यास जातात. परंतु तेथे गेल्यावर गप्पाष्टके सुरूं करतात ! किंवा बसल्या बसल्याच झोपीं जातात! अशी श्रवणभक्ति काय कामाची ! या योगें अज्ञान दूर होऊन मोक्षपदाकडे वाटचाल कशी होणार ?

**चौथी सेवनभक्ति**. मुळांत सर्वच ब्रह्मरूप आहे. मग सेवा घेणारा आणि सेवा करणारा हा भेद आला कुठून ? परंतु सर्वसामान्य लोक द्वैत मानणारें असतात. यासाठींच श्रुतींनी सेवाभक्ति सांगितली आहे.वज्र, अंकुश, ध्वज आणि पद्म या शुभचिन्हांनीं युक्त अशा भगवंताच्या चरणांची सेवा करावी म्हणजे निश्चितपणें मुक्ति मिळेल.

यानंतर **अर्चनभक्ति**. भगवंताची उत्तम प्रतिमा तयार करून तिची अत्यंत भक्तिभावानें सर्वोपचारांनीं पूजा करणें याचें नांव अर्च्चन. ही पूजा त्रिकाल करावी. किंवा प्रात:कालीं षोडशोपचारांनीं आणि माध्यान्हीं पंचोपचारांनीं पूजा करून रात्रौ आरती करावी. आपल्याला प्रिय असलेली प्रत्येक वस्तू देवापुढे ठेवावी. अशाप्रकारें भगवंताची प्रीति संपादन करून मुक्त व्हावें. मूर्तीची पूजा डोळ्यानें पाहून डोळे मिटून तशीच चित्तांत रेखावी. आणि तेथेंच आपलें चित्त एकाग्र करावें. पूजा झाल्यानंतर देवासमोर बसून एकाकार वृत्तीनें 'गुरुदत्त' मंत्राचा



जप करावा.

सहावी **वन्दनभक्ति**. वन्दन करणें याचा अर्थ नमस्कार करणें. ब्राह्मणापासून चाण्डाळापर्यंत, त्याचप्रमाणें गाई, घोडे, कुत्रीं, गाढवें इत्यादि प्राण्यांसकट स्थावर जंगमात्मक अशा सर्व प्राण्यांना सतत नमस्कार करावा. यायोगें समबुद्धि निर्माण होईल. सर्वांच्या अंतर्यामीं एक परमेश्वरच भरून राहिला आहे अशी भावना ठेवून सर्वांना वन्दन करीत असावें. (परमेश्वर सर्वत्र असल्यामुळें कोणालाहि केलेला नमस्कार त्यालाच पोंचतो)

यापुढची **दास्यभक्ति**. आपण सदैव एखाद्या दासाप्रमाणें रहावें. एखादा सेवक धन्याच्या आज्ञेत राहून त्याची सेवा करतो, त्यावेळीं तो आळस सोडून देतो, मानापमानाची चिन्ता करीत नाही; आपणहि या सेवकाप्रमाणेंच वागून परमेश्वराची रात्रंदिवस सेवा करावी. त्यावेळीं आपल्या योगक्षेमाची चिन्ता बाळगूं नये. त्याची काळजी तो (परमेश्वर) घेईल !

यानंतर **सख्यभक्ति**. परमेश्वर सर्वांच्या हृदयांत प्रवेश करून राहिला आहे अशा अर्थाची, 'सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो' ही स्मृति प्रसिद्धच आहे. अनेक कल्पें लोटलीं, अनेक देह आले आणि गेले, परन्तु त्या परमेश्वरानें आम्हांला क्षणभरदेखील अंतर दिलें नाहीं. अशा त्या सर्व श्रेठ प्रियतम परमेश्वराशीं सख्य

जोडावें. मात्र हें सख्य निरपेक्ष असावें. सदैव त्यांचें स्मरण ठेवावें. क्षणभरदेखील त्याला विसरूं नये. त्याच्या इच्छेनें वागावें. (म्हणजे तो जें करील त्यांतच आपलें हित आहे असें समजून वागावें.) अशी सख्यभक्ति ज्याला साधली त्याला पुनर्जन्म नाहीं.

नववी **आत्मनिवेदनभक्ति**. निवेदन करणें याचा अर्थ अर्पण करणें. आपले शरीर, मन, धन, परिवार, घरदार सर्व ईश्वराला अर्पण करावें. अशाप्रकारे नि:संग होण्यासाठीं, मी केवळ शुद्ध बुद्ध (ज्ञानरूप) आत्मा असून मी अद्वितीय स्वत:सिद्ध, पापरहित आणि नित्य असून मला कर्तृत्व भोक्तृत्व नाहीं, आणि म्हणूनच मी बद्ध नाहीं. सदैव मुक्तच आहे असा अभ्यासानें ठाम निश्चय करावा.

अत्रिऋषींनीं या नवविधा भक्तीच्या योगेच सर्व देवांना प्रसन्न केलें, इतकेंच नव्हे तर ते 'देवपिता'ही बनले !

आतां हे अत्रिऋषी कोण तें सांगतों.

परमात्म्यानें केवळ ईक्षणें करून म्हणजेच केवळ दृष्टिक्षेप करून या समस्त सृष्टीची निर्मिती केली. त्यानंतर त्यानें ब्रह्मदेवांना निर्माण केलें आणि त्यांच्या हातांत वेद देऊन त्यानुसार या सृष्टीची व्यवस्था लावण्याची त्यांना आज्ञा केली.

या ब्रह्मदेवांचे सात मानसपुत्र होते. त्यापैकीं अत्रि ऋषि दुसरे. या ऋषींनी तीन देहांचा (स्थूल, सूक्ष्म आणि कारण) अभिमान सोडला, तीन अवस्थांचा (जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति) त्याग केला, आणि ते तीन गुणांच्या (सत्व, रज आणि तम) पलिकडे गेले, म्हणून त्यांना अत्रि असे नांव पडलें.

निष्कल्मष (पापरहित) अशा ब्रह्मदेवांचें सर्व तपच जणूं त्यांच्या नेत्राद्वारें आपोआप बाहेर पडून अत्रिऋषींच्या रुपानें साकारलें !

असे हे अत्रिऋषी !

सृष्टीची उत्पत्ति झाल्यानंतर एकदां प्रथमच सूर्याला ग्रहण लागलें. कुणालाच त्या विलक्षण घटनेचें कारण सांगतां येईना. परंतु अत्रि ऋषि सर्वज्ञ होते. त्यांनी त्यामागचे रहस्य प्रकट केलें. त्याचप्रमाणें शीघ्र फलप्रद अशा ऋग्वेदाच्या पांचव्या मंडलाचा गूढार्थ त्यांनीच स्पष्ट करून सांगितला.

एकदां कृतयुगांत सर्व लोक रोगराईमुळे हैराण झाले. त्यावेळीं अत्रिऋषींनीच वैद्य बनून त्यांचे रोग नष्ट केले आणि त्यायोगें सर्व लोक सुखी झाले.

तसेंच, मनूनें तयार केलेली स्मृति सामान्य लोकांना आकलन होईनाशी झाली, तेव्हां याच अत्रि ऋषींनीं तेवढ्याच योग्यतेची, परंतु सोपी अशी दुसरी स्मृति तयार करून लोकांची अडचण दूर केली.

अत्रिऋषी अतिशय निरिच्छ होते. तसेच ते फार मोठे तपस्वी होते. परंतु केवळ पित्याच्या आज्ञेचें पालन करण्यासाठींच या निरिच्छ मुनींनी अनसूयेशीं विवाह केला.

ही अनसूया कोण होती ठाऊक आहे ?

अनसूय ही कर्दम आणि देवहुती यांची कन्या. कर्दम ऋषींचें सर्व तपच जणूं अनसूयेच्या रूपानें देवहुतीच्या उदरांत मूर्तिमंत प्रकट झालें !

अशी ही अनसूया ! तिच्याआश्रमांतून एकहि अतिथी स्वप्नांतदेखील विन्मुख होऊन कधीं परत गेला नहीं ! हिनेंच नग्न होऊन त्रिमूर्तींना भिक्षा घातली. ती कथा खरोखरच ऐकण्यासारखी आहे :

अनसूयेच्या आश्रमांतून कोणताही अतिथी केव्हांही विन्मुख होऊन परत जात नाहीं, ही गोष्ट ज्यावेळीं सावित्री, लक्ष्मी आणि पार्वती यांना समजली तेव्हां त्यातिघींना अनसूयेचा मत्सर वाटूं लागला. आणि अनसूयेचें सत्व हरण करण्यासाठीं त्यांनीं आपापल्या पतींना तिच्याआश्रमांत पाठविण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें त्यांच्या पतींनीं अतिथींचा वेष धारण केला आणि ते अत्रिऋषींच्या आश्रमाजवळ आले, त्यावेळीं अत्रिऋषी आश्रमांत नव्हते. म्हणून अनसूयेनेंच त्या तिघांचें स्वागत केलें. त्याप्रसंगीं 'आम्हांला नग्न होवून भिक्षा घाल' अशी विचित्र अट त्या अतिथींनीं तिला घातली. तेव्हां अनसूयेनें पतिचरणांचें चिन्तन केलें आणि ती भिक्षा वाढण्यासाठीं नग्न होऊन बाहेर आली. परन्तु त्याचवेळीं तिच्या तपोबळाच्या योगें त्या तिन्ही अतिथींचें रूपान्तर तीन बालकांत झालें !

हें पाहून सावित्री, लक्ष्मी आणि पार्वती यांचा गर्व नष्ट झाला आणि दीन होऊन, आपले पति परत मागण्यासाठीं त्या अनसूयेकडे आल्या. त्यावेळीं अनसूयेनें ती तिन्हीं बाळें त्यांयापुढें ठेवलीं आणि आपापला पति शोधून घेण्यास त्यांना सांगितलें. परन्तु त्यातिघींनाहि ते शक्य झालें नाहीं !

तें पाहून अनसूयेनें हंसून प्रत्येकीला तिचा पति परत केला !

अनसूयेला हें विलक्षण सामर्थ्य पतिव्रता धर्माचें निष्ठेनें पालन केल्यामुळेंच प्राप्त झालें.

तिच्या सामर्थ्याच्या आणखी कितीतरी गोष्टी आहेत.

कौशिकाच्या पत्नीनें शाप दिल्यामुळें सूर्याचा उदयच

होईना. त्यायोगें पृथ्वीवर एकच हाहा:कार उडाला. अनेक प्राणी पटापट मरूं लागले. तेव्हां अनसूयेनें कौशिकाच्या पत्नीची समजूत घालून सूर्योदय घडवून आणला आणि सर्व जगाची चिन्ता दूर केली.

परंतु माण्डव्य ऋषींच्या शापानुसार सूर्योदय होतांच कौशिक मरण पावला आणि तें पाहून त्याच्या पत्नीनें एकच आकान्त केला. तेव्हां अनसूयेनें आपल्या तपोबळानें कौशिकाला पुन्हां जिवंत केलें, तें तिचें विलक्षण सामर्थ्य पाहून देवदेखील प्रसन्न झाले आणि त्यांनीं, 'तिन्ही देव (ब्रह्मा, विष्णू आणि महेश) तुझे पुत्र होऊन तुझ्या आधीन राहतील' असा तिला वर दिला !

अशी ही अनसूया !

तिचें विलक्षण सामर्थ्य पाहून देवदेखील चळांचळां कांपत ! धरा (पृथ्वी) तिच्यासाठीं मृदू बने, तिला त्रास होऊं नये यासाठीं वारादेखील मन्द मन्द वाहत असे, एवढेंच काय, परन्तु प्रत्यक्ष सूर्यनारायणदेखील तिला ताप होऊं नये म्हणून शीतलता धारण करी !

तिच्या अप्रतिम सौंदर्याचें तरी काय वर्णन करावें !

तिच्या रूपाला चंद्राची उपमा द्यावी तर मनाला पटत नाहीं; कारण चंद्र कितीहि सुन्दर असला तरी त्याला वृद्धि आणि क्षय आहेत. पौर्णिमेच्या रात्री तो आल्हादक तेजानें चमकला तरी रात्र सरतांच तो निस्तेज होतो ! म्हणून पौर्णिमेच्या चंद्राची उपमेदेखील देतां येत नाहीं. बरें, तेजस्वी सूर्याची उपमा द्यावी तरीदेखील ती योग्य ठरत नाहीं. कारण सूर्य कितीही तेजस्वी असूं द्या, उदय आणि अन्त या दोन्ही वेळीं त्याचें तेज फिकेंच असतें ! आणि अनसूया तर नित्य तेजस्वी ! एवंच, अनसूयेप्रमाणें नित्य तेजस्वी, नित्य सुंदर अशी वस्तूच तिला उपमा द्यावयास सांपडत नाहीं !

खरोखर, अनसूयेचें माहात्म्य कोणत्या शब्दांत वर्णन करावें बरें ?

दया, क्षमा, शांति इ. सद्गुणांनीं युक्त असा जो जगन्नियामक भगवान् विष्णु एकदां कपिल मुनींच्या रूपानें तिचा अनुज म्हणजे बंधु झाला आणि तोच दुसऱ्यावेळीं आत्मज म्हणजे दत्तरूपानें पुत्र झाला !

अशा त्या परमसामर्थ्यशाली, परमसुंदर आणि परमतेजस्वी अनसूयेला कुणाचीच उपमा शोभून दिसत नाहीं.

अनसूया म्हणजे केवळ चित्कलाच होय ! असें हें साध्वीरत्न अत्रिऋषींना अनायासें लाभलें, आणि निर्गुण निराकार



परमेश्वरानें तिच्या पोटीं जन्म घेऊन सगुण साकार रूपांत या पृथ्वीतलावर अवतार घेतला; कारण, प्रकट होण्यासाठीं एवढें सुयोग्य स्थान अनसूयेच्या उदराशिवाय त्याला तरी दुसरें कोणतें आढळणार ? आणि म्हणूनच त्यानें अनसूयेची उत्पत्ति केली किंवा काय कुणास ठाऊक !

यावरून अनसूया आणि माया यांची तुलना करण्याचा कुणाला मोह होईल. परंतु तशीही तुलना करतां येत नाहीं. कारण माया जड तर अनसूया चैतन्यरूप ! तेंव्हा अनसूया पुन्हां निरुपमच राहते !

अशा या अनसूयेच्या घरीं स्वत: भगवंत पुत्ररूपानें प्रकट झाले. हेच भगवान् दत्तात्रेय !

जे दत्तक पुत्र असतात त्यांना दोन वडिल असतात. म्हणून त्यांना 'द्व्यामुष्यायण' असें म्हणतात. भगवान् दत्तात्रेयांनीदेखील स्वत:चेंच दान केलें, परंतु त्यांना 'द्व्यामुष्यायण' म्हणतां येणार नाहीं. कारण त्या परमात्म्याला माता-पिता कुळगोत्र कोठून असणार ? अप्रमेय परमात्म्यानें केवळ भक्तीला भुलून स्वत:चेंच दान दिलें आणि तो दत्तात्रेय नांवानें प्रकट झाला !

❖❖❖

# शैव-आगमातील योगमार्ग

- डॉ. ग. वा. तगारे, सांगली.

शैव साहित्यावरील माझ्या मागील लेखात 'शैव आगमांचा' उल्लेख केला होता. यातील 'आगम' या संज्ञेचा अर्थ ''भगवान् शिवापासून गुरुपरंपरेने चालत आलेले ज्ञान ही व्याख्या शिवाचा २८वा अवतार लकुलीश याने रचलेल्या 'पाशुपत सूत्राचा' टीकाकार (अर्थ विवेचन करणारा) कौंडिन्य याने दिली आहे.

**आगमो नाम आ महेश्वराद् गुरुपारम्पर्यागतं शास्त्रम्।**

(पाशुपतसूत्र ५.८ पृ. ७)

आगमानाच 'तंत्र' असे म्हणतात. शैव आचार्यांच्या मते वेद आणि आगम यांचा कर्ता शिव असल्यामुळे ते दोन्ही प्रमाण आहेत. काही तंत्रे 'आपण वेदांचे सार आहोत' असे सांगतात.

**वेदसारमिदं तन्त्रम्।**

असे 'मुकुटागमाने स्वत:बद्दल म्हटले आहे.

'सुप्रभेद' नामक आगम एक पाऊल पुढे जाऊन म्हणतो की आपण वेदांचे सार सांगत आहोत. आपले म्हणणे म्हणजे 'सिद्धान्त' आहे.

**सिद्धान्तो वेदसारत्वात्।**

शैव आगमात सर्वत्र आपण वेदांचे विरुद्ध नसून वेदाधार असलेले ज्ञान सांगतो यावर कटाक्षाने भर दिलेला आढळतो. यातील ज्ञान बहुधा शिव-पार्वती संवादरुपाने सांगितलेले असते. त्यामुळे त्यांच्यामध्ये अवैदिकपणा किंवा वेदविरुद्ध काही नसते.

'तंत्र' हा शब्द 'तन्' - विस्तारणे, मुबलक देणे (तनोति विपुलान् अर्थान्) आणि 'त्रै' - रक्षण करणे (त्रामरं च कुरुते) अशा दोन यात् पासून बनला आहे. त्यात वेदांचा संबंध कुठे येतो हे प्राचीन ग्रंथकारांनी स्पष्ट केले आहे. शुक्रनीतिसारामध्ये (४ - ३.३१) तन्त्र हा अथर्ववेदाचा उपवेद आहे असे म्हटले आहे.

**अथर्वणां चोपवेदस्तन्त्ररूपो स एवहि।**

सिद्धान्त शिखामणी या ८व्या शतकातील ग्रंथात 'शैवतंत्र हा शिवाने सांगितलेला सिद्धान्त आहे. तो सर्व वेदार्थरुप असल्यामुळे तो वेदासारखाच प्रमाण आहे' असे म्हटले आहे.

**शैवतन्त्रमिति प्रोक्तं सिद्धान्ताख्यं शिवोदितम्।**
**सर्ववेदार्थरूपत्वात् प्रामाण्यं वेदवत् सदा**

(सिद्धान्त शिखामणि ५-८)

या शैव आगमांची संख्या २८ आहे. शैव आगमांचे अथवा तंत्रांचे महत्त्व लक्षात घेता त्यातील योगमार्गाचे दिग्दर्शन उपयुक्त ठरेल असे वाटते. हा 'शिवयोग' किंवा 'शैव योगमार्ग' शैव आगमांच्या तिसऱ्या 'योगपाद' नामक पादात दिलेला असतो ('चर्या' व 'क्रिया' या पहिल्या दोन भागात लोकांना रस वाटणार नाही म्हणून ते भाग गाळले आहेत).

मी आज 'मृगेन्द्रागम' या शैव आगमातील योगमार्गाची रुपरेषा संक्षिप्तपणे देत आहे. या आगमावर 'नारायण कंठ' या जुन्या काश्मीरी टीकाकाराची टीका आहे हा आगम काश्मीर दरबारच्या ग्रंथमालेत इ.स. १९३० मध्ये प्रसिद्ध झाला.

या तंत्रात ग्रंथकाराने काही प्राथमिक क्रिया गृहीत धरल्या आहेत. योगमार्गात प्रवेश करण्यापूर्वी अधिकारी सद्‌गुरूकडून दीक्षा घेणे आवश्यक आहे. दीक्षा म्हणजे 'जिच्यामुळे शिवाविषयीचे ज्ञान होते आणि जीवाला असलेले कर्म आणि माया यांचे पाश नाहीसे होतात त्या ज्ञानदर्शक विधीला' दीक्षा म्हटले आहे.

**दीयते च शिवज्ञानं क्षीयते पाप बन्धम्।**

(सिद्धान्त शिखामणि ६-११)

यावेळी मंत्रदीक्षा - **'शिवाय नम:'** दिली जाते.

दीक्षेचे मूळस्वरुप असे आहे. दीक्षाविधी सर्व सांप्रदायात असतो. उत्तरकाळात दीक्षाविधीचा साधेपणा जाऊन त्यात कर्मकांड आले (किंवा हेतुपुरस्सर) आणले गेले. भट्ट नारायण कंठानी योगपादाचे प्रयोजन सांगताना आगमाच्या पहिल्या दोन पादात - विद्यावाद आणि क्रियापाद - यांच्यामुळे

आतत्मज्ञानासाठी योगाची (या तिसऱ्या योगपादाची) आवश्यकता प्रतिपादन केली आहे.

प्रथम एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की पतंजलीच्या काळापर्यंत ध्यानयोगाचा इतका विकास झाला हाता की हिंदू धर्माचा कोणताही संप्रदाय - वैदिक जैन वा बौद्ध असो, त्यांचे तत्त्वज्ञान निराळे असेल पण साधनामार्ग पतंजलीच्या तद्विषयक योगसुत्रासारखा असतो. त्यामुळे भृगेंद्र तंत्रातील योगपाद वाचताना पातंजल योगसूत्राशी त्यांचे साम्य आढळते.

भृगेंद्र तंत्रात 'आत्मसाक्षात्कारासाठी योगी होण्याची आवश्यकता आहे' हा ग्रंथाचा उद्देश स्पष्ट करून त्याचा साधनामार्ग सांगितला आहे. त्यात प्रथम इंद्रियजयाला (जिताक्षत्वम्) प्राधान्य दिले असून ते प्राणायाम वगैरे केल्याने हळूहळू (शनैः शनैः) साध्य करून घ्यावे (श्लोकर) असे मार्गदर्शन केले आहे.

या आगमकाराच्या मते (१) प्राणायाम, (२) प्रत्याहार, (३) धारणा, (४) ध्यान, (५) वीक्षण, (६) जप आणि (७) समाधी अशी या योगाची अंगे आहेत. (श्लोक) पण पातंजल अष्टांग योगाची कल्पना इतकी रूढ झाली होती की 'स्वतः योगी हे आठवे अंग मानावे' असा नारायण कंठ पुस्ती जोडतो. प्राणायामामुळे इंद्रियसंकल्प किंवा कर्मांचा उपशम होतो असे आगमकार म्हणतात (श्लो. ४)

यानंतरचे अंग प्रत्याहारः इंद्रियांची विषयांकडील ओढ कमी करणे.

**चेतसः सर्वेभ्यः एव इंद्रियार्थेभ्यः प्रत्याहरणम्**

(भट्ट नारायण कण्ठ)

विषयांकडील मनाचे आकर्षण कमी झाले की 'धारणा' सिद्ध होते (श्लो. ६). पतंजलीने **'देशबन्धश्चित्तस्य धारणा'** अशी व्याख्या केली आहे. चित्त धारणेने एकाग्र झाले की भगवान् शिवासारख्या देवतेचे चिंतन करावे (शिवाद्याकारविषया चिन्ता)

आठवे अंग समाधीची ज्यावेळी ध्यानात एकतानता होऊन ध्येयवस्थूच केवळ भासमान होते त्याला 'समाधि' म्हणतात. पतंजलीनी समाधी अवस्थेबद्दल म्हटले आहे, ''ज्या ध्यानामध्ये ध्येयवस्तू केवळ अर्थमात्र भासते आणि ज्या ध्यानाचे स्वरुप शून्यस्वरुप होते असे ध्यान म्हणजे समाधी होय.

**तदेव अर्थमात्र निर्भासं स्वरुपशून्यमिव समाधिः ।**

(पातंजल योगसूत्र ३.३)

पातंजल योगसूत्राशी तुलना करण्यासाठी हे सूत्र उद्धृत केले आहे.

भृगेंद्र तंत्रातील एक अंग राहिले ते म्हणजे जप. मंत्रजप करताना तो पुटपुटल्यासारखा (उपांशु) करावयाचा असतो हे सर्वांस माहित आहे.

अशातऱ्हेने योगाभ्यास करून सिद्धी मिळाल्याची फलश्रुती आगमकार सांगतात :

''अशा योग्याच्या सर्वशक्तीसूर्याच्या प्रकाशाप्रमाणे सर्व विश्व व्यापतात. त्या योग्याच्या ज्ञान, क्रिया यांच्या तेजामुळे माणसेच नव्हे तर राक्षस, दानव त्याच्या वाटेस जाण्यास धजत नाहीत (श्लोक ११)

उरलेल्या भागात प्राणायामादि प्रक्रियांची तपशीलवार चर्चा सामान्य वाचकांना गुरुमुखाशिवाय क्लिष्ट वाटणारी आहे.

आगमाचा समारोप करताना 'या आगमातील योगविधीमुळे ऐहिक सुखोपभोग (भुक्ति) आणि मरणोत्तर मोक्ष मुक्ति) मिळेल.' अशी फलश्रुती सांगितली आहे.

वाचकांनी अधिकारी योगतज्ज्ञाच्या मार्गदर्शनाशिवाय यातील प्राणायामादि करण्याचे प्रयत्न करू नयेत.

आगम म्हणजे काय आणि त्यापैकी एका प्रसिद्ध आगमात सांगितलेला यागमार्ग मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

## साई भजन

**लिंबवृक्षाच्या छायेखाली साई दत्त गुरु ।**
**आमुचे साईनाथ कल्पतरु ।।**

**पणत्यात पाणीओतूनी प्रकाश पाडिला ।**
**वाणियांचा अहंकार त्यांनी झाडविला ।।**

**साई नाम ज्याचे मुखी ।**
**तोचि आहे जगी सुखी ।।**

**साईध्यान तेची धन ।**
**माना हेचि समाधान ।।**

**नितीन जनार्दन साटम**

# १२१ गणेशस्थानांचे सुंदर व संग्राह्य शब्ददर्शन



## आत्मनिष्ठ संकल्प, प्रयत्नांची शिकस्त साकारला ग्रंथ "१२१ गणेशदर्शन" श्रीगणेशकृपे



कोणत्याही कार्याचा प्रारंभ ॐकारस्वरुपी श्री गजाननाला वंदून, 'श्रीगणेशाय नम:'ने केला जातो. कोणत्याही कार्यात प्रारंभापासून पूर्ण होईपर्यंतच्या टप्प्यात विविध कटु-गोड अनुभव येत असतात. या पल्ल्यात विघ्ने, अडथळे येऊन सर्वसामान्य माणूस संभ्रमित होऊन हाती घेतलेले कार्य तडीस जाईल की नाही याबद्दल साशंक, व्यथित होतो. अकल्पित संकटांमुळे माणूस चिंता-क्लेषादी मानसिक अवस्थांनी घेरला जातो व त्याची स्थिरबुद्धी विचलित होण्याची दाट शक्यता असते. अशा बिकट प्रसंगी श्री गणेशाची उपासना त्याला कार्यरत राहण्याची प्रेरणा देते. कारण आत्मनिष्ठेने व त्यासाठीच्या चिकाटीने केलेला संकल्प सिद्धीस नेण्यास 'श्री' समर्थ आहेत. श्री गणेश ही मनोकामनापूर्ती, संकटनाशन करणारी, मन:शांती देणारी देवता आहे, असा सश्रद्ध भाविकांचा अनुभव आहे. अशा या ६३ कला-विद्यांच्या आद्यदैवताचा विलक्षण अनुभव येऊन श्रींच्या १२१ स्थानांची महती वर्णन करणारा ग्रंथ अलिकडेच साकार झाला आहे. धार्मिक लेखनाचा प्रारंभ तर मुळी 'श्रीं'ना अग्रस्थान देऊन केला जातो. श्री साईभक्त जाणतातच की श्रीसाईसचरिताच्या प्रत्येक अध्यायाची सुरुवात **॥ श्री गणेशाय नम: ॥** अशा मंगलवंदनाने, अभिवंदनाने आहे. श्रीसाईसचरितकारांनी श्री साईंना गिरिजानंदनाच्या रुपात पाहिले आहे. म्हणूनच ते म्हणतात.... **हा साईच गजानन गणपती। हा साईच घेऊनि परशू हातीं। करोनि विघ्नविच्छित्ती। निज व्युत्पत्ति करू कां॥ हे सर्वमंगलमांगल्या। लंबोदरा गणराया। अभेदरूपा साई सदया। निजसुखनिलया नेई गा॥** अशा या निर्गुण निराकार गणेशब्रह्माच्या महाराष्ट्रातील १२१ स्थानांची साद्यंत माहिती '१२१ गणेशदर्शन' या ग्रंथात देण्यात आली आहे. विशेष म्हणजे ध्यानीमनी नसताना लेखकाला १२१ गणेशस्थानांच्या संकलनासाठी स्वप्नदृष्टांत झाला, गणेशदर्शन झाले, श्रींच्या प्रेरणेने संकल्प सोडला गेला, नानाविध विघ्ने येऊन कसोटी पाहिली गेली, श्रींच्या कृपेने विघ्नांचा, संकटांचा नाश झाला आणि अल्पावधीत, वर्षभरात महाराष्ट्रातील १२१ गणेशस्थानांना छापील शब्दरूप प्राप्त झाले, संकल्प सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेत याची साक्षात् प्रचिती आली; आणि साश्रूनयनांतील आनंदाश्रू श्रीचरणी ओघळले. श्री गणेशाच्या इच्छेने, कृपेने साकारलेला हा ग्रंथ संग्राह्य असाच आहे. महाराष्ट्रातील पुणे, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा, सांगली, नगर, जळगाव, नाशिक, यवतमाळ, धुळे, वर्धा, बीड, जालना, अमरावती, नागपूर, भंडारा, औरंगाबाद या जिल्ह्यांतील आपल्याला परिचित-अपरिचित अशा १२१ गणेशस्थानांचं वर्णन करताना त्याविषयीची ऐतिहासिक पार्श्वभूमी, मूर्तीवैशिष्ट्य इत्यादी माहिती सखोल देण्यात आली आहे. दर्शनार्थींना आवश्यक असलेली तेथील पूजा-अर्चा, उत्सव, यात्रा, राहण्या-जेवण्याची सोय, प्रवासमार्ग आदी माहितीही ग्रंथात उपलब्ध करुन देण्यात आली आहे. दर्जेदार कागद, उत्कृष्ट छपाई, टिकाऊ बांधणी यामुळे १९६ पृष्ठांचा मोठ्या आकारातील हा ग्रंथ तांत्रिकदृष्ट्याही उल्लेखनीय झाला आहे. गुळगुळीत कागदावर गणेशाच्या मूर्तींची रंगीत, सुबक छायाचित्रे लक्ष वेधून घेतात. मुखपृष्ठ तर कलेच्या, बुद्धीच्या देवतेला साजेलसंच झालं आहे. संतमहंतांनी श्रीगणेशावर शब्दबद्ध केलेल्या आरत्या, स्तोत्रे, भूपाळ्या, स्तवन, अथर्वशीर्ष, सूक्तें, स्तुती, प्रार्थना, मंत्र, अर्चना, पसायदान, श्लोक यांचा पुस्तकातील समावेश भाविकांच्या माहितीत अधिक भर घालणारा आहे.

**– श्रीसाईचरणकण**

ग्रंथाचे नाव : '१२१ गणेशदर्शन' संकलक : संजय वेंगुर्लेकर
प्रकाशक : संजना पब्लिकेशन, १/८, एम.एच.बी. कॉलनी, एस्.एल्. रहेजा रोड, माहिम (प.), मुंबई - ४०० ०१६.
पृष्ठे : १९६ मूल्य : रु. २५०/-

❖ ❖ ❖



# अभिप्राय




## विशेषांक म्हणजे अक्षर प्रसाद

श्री विद्याधर ताठे; कार्यकारी संपादक यांना -

'श्री साईलीला'चा श्री साईबाबा पुण्यतिथी निमित्तचा दसरा विशेषांक मिळाला. हा विशेषांक म्हणजे **'अक्षर प्रसाद'** आहे. विशेषांक अंतर्बाह्य सुरेख व समृद्ध आहे. तुमच्या समर्थ संपादनाची प्रसादचिन्हे पानोपानी उमटलेली आहेत. फार समाधान झाले.आपले हार्दिक अभिनंदन !

**प्रा. डॉ. हेमन्त वि. इनामदार**
एम्.ए.पीएच.डी.
अध्यक्ष, गीता धर्म मंडळ, पुणे.

## खरोखरीच उत्कृष्ट विशेषांक

श्री साईलीलाचा पुण्यतिथी अंक, पुण्यतिथीपूर्वीच म्हणजे अगदी उचित वेळेवर हाती पडला. अंक पाहून खूप समाधान वाटले. अंक तपशिलवार वाचला नाही पण वरवर चाळता तो खरोखरीच उत्कृष्ट झाला असल्याचे आढळले. आपल्या संपादनकौशल्याचा मुलामा सर्वत्र मनात भरतो. आपल्या कुशल संपादकत्वाखाली श्री साईलीलाची उत्तरोत्तर भरभराट होवो व मराठीतील सर्वाधिक खपाचे ते मासिक व्हावे ही साईचरणी प्रार्थना.

**ॲडव्होकेट अरुण गोडबोले**
आयकर सल्लागार,
चित्रपट निर्माता, सातारा.

## सुंदर विशेषांक

श्री साईलीला पुण्यतिथी विशेषांक वाचण्यात आला. मी नियमित अंक वाचत नाही तथापी दृष्टीक्षेप टाकण्याचा छंद आहे. दसरा विशेषांक सुंदर झाला आहे. अंतरंगातील मनोगत, संपादकीय, विश्वस्त मंडळाच्या कार्याचा आढावा, शिरडी वृत्त विशेष आवडले. आचार्यांची दिव्यदृष्टी, महाराष्ट्राचे नाथ, साईचे बोल होती न फोल हे लेख मनापासून वाचले. खूपच आवडले.

'श्री साईलीला'चे वर्गणीदार वाढविण्याबद्दल आपण भक्तांना केलेले आवाहन उत्तम व योग्य आहे. श्रीसंदेशाचा प्रचार होण्यासाठी आपण जी धडपड करीत आहात ती कौतुकास्पद आहे.

**आप्पासाहेब कोते पाटील**
विश्वस्त, साईबाबा संस्थान शिरडी.



## सर्वोत्कृष्ट विशेषांक

'श्री साईलीला'चा पुण्यतिथी विशेषांक मिळाला; साईकृपेचा सुवर्णमयी अमृतकुंभ प्राप्त झाल्याचा मनोमनी आनंद झाला. संपूर्ण अंक वाचला अन् मन तृप्त झाले, दिवाळी अंकाच्या सदराखाली दरवर्षी शेकडो अंक प्रसिद्ध होतात; त्यांत ज्ञान देणारे, संस्कारक्षम अंक जेमतेम बोटावर मोजण्याइतके असतात; त्यांत 'श्री साईलीला'ला माझ्या दृष्टीने प्रथम क्रमांक द्यावा लागेल.

विश्वस्त मंडळाच्या कार्याचा आढावा व शिरडी वृत्त मला खूप उद्बोधक वाटले. मंडळाची समाजसेवा अप्रतिम आहे, यात वाद असूच शकत नाही. भक्तांच्या सोयीकडे मंडळाचे सर्वांगीण प्रयत्न चालू आहेत या बाबीचं कौतुक करा तितके थोडंच आहे. राज्य शासने व केंद्रीय शासने अशी नि:स्वार्थी सेवा खरोखरच करूं लागली (बडबड न करता, घोषणा न ठोकता) तर या भारतभूमीवर जरूर स्वर्ग अवतरेल !

परमाचार्य, महायोगी देवराहा बाबा, संतकवि दासगणू महाराज, महामानव विनोबा भावे, संत गाडगे महाराज, संत एकनाथ महाराज, आदिशक्ति मुक्ताई आदींची चरित्रे अतिशय उद्बोधक ठरतील अशी लेखकांच्या लेखणीतून समर्थपणे उतरलेली आहेत. प्राथमिक शाळांच्या क्रमिक पुस्तकांमध्ये असे प्रभावी व संस्कारक्षम पाठ समाविष्ठ करण्यांत आले, तर भावी पिढीचा कायापालट झाल्याविना राहणार नाही. पण हे करायचे कुणी ? हाच प्रश्न आज पुढें आहे.

ज्ञानदेव-विवेकानंद, नवनाथ भक्तिरसामृत, भक्तिरंग, आदिशक्ती मुक्ताई, दासबोध या ग्रंथांचा अभ्यासपूर्ण परीक्षण अनमोल आहे. त्याचप्रमाणे गुरुपौर्णिमा उत्सवाची रंगीत छायाचित्रे, मुखपृष्ठ तर मला खूप आवडले.

एकंदरीने अंक सर्वोत्कृष्ट !

**एस. ए. कुलकर्णी**
सांगली.

## आकर्षक मांडणी, उत्तम निवड

श्री साईलीलाचा पुण्यतिथी अंक मिळाला. अंकाची मांडणी आकर्षक आहे. लेखाची निवड उत्तम आहे. संतांच्या शिकवणुकीतून समाजप्रबोधनाचे कार्य व्हावे या दृष्टिने विविध लेखकांनी लिहिलेले लेख, मननीय व चिंतनीय आहेत. साईभक्तांची हृदये या अंकामुळे आनंद उर्मीनी निश्चितच उचंबळून येतील व दीपावलच्या शुभ मंगलप्रसंगी असंख्य भक्तीदीप प्रत्येकाच्या मनात प्रज्वलित होतील.

**गजानन कुलकर्णी**
रत्नागिरी.

## बाबांच्या प्रेरणेची छाप

आपले पत्र व सोबत साईलीलाचा पुण्यतिथी अंक मिळाला व दुधात साखर या उक्तीचा अमृतानुभव कसा असतो याची अनुभूति साईकृपेमुळे प्राप्त झाली.

जी वस्तू चांगली आहे तिला चांगलीच म्हणावी लागते. त्याप्रमाणे पुण्यतिथी विशेषांक उत्तम प्रकारचा सर्वांगसुंदर आहे. या विशेषांकाची बैठक 'दैवी-प्रेम' असल्यामुळे अंक वाचून शांती-समाधान लाभते. आपल्या संपादकीय विचारांवर बाबांच्या प्रेरणेची छाप उमटलेली आहे. श्रीबाबांचे हे दिव्यकार्य आपल्या हातून असेच अव्याहतपणे चालू राहावे.

**श्याम जुवळे**, मुंबई.



# साईभक्तांना आवाहन



प्रिय साईभक्तांनो !
सप्रेम नमस्कार,

आपण 'श्री साईलीला'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. 'श्री साईलीला'चे नवे स्वरूप आपण सर्वांनाच आवडले आहे. आपणापैकी तशी पत्रे आम्हाला पाठविली आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी 'श्री साईलीला' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवा. या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार 'श्री साईलीला'स मिळवून द्यायचे. यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावर कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे.

कळावे. श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !

आपला स्नेहांकीत,
**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक
'श्री साईलीला'

---------- ✂ ---------- इथे कापा ---------- ✂ ----------

कार्यकारी संपादक
'श्री साईलीला',
८०४-बी, साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),
मुंबई - ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येक ५० रु. प्रमाणे रु. २५० (एकूण दोनशेपन्नास मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.

आपला,

नाव : ____________________

पत्ता : ____________________

____________________

(ता.क.: सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु-क्रमांक | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ४८.०० | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | २४.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २३.०० | १०.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | २२.०० | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २७.०० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २७.०० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ९.५० | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ६.६५ | ८.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ८.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ८.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ८.०० |
| १७. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | २.०० | ८.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.२५ | ८.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ८.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | १.१० | ८.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ४.६० | ८.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | - | ८.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ३.०० | ८.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | - | ८.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | २.०० | ८.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ८.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | २.०० | ८.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ८.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | - | ८.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ८.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ८.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | - | ८.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ८.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | - | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ११.०० | १०.०० |

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित फोटोंची यादी

| अनु-क्रमांक | फोटोचे नाव | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| २. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | पोष्टकार्ड | - |
| ३. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | २'' x ३'' | ०.२० |
| ४. | द्वारकामाई (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| ५. | द्वारकामाई (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ६. | मूर्ती (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| ७. | मूर्ती (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ८. | मूर्ती (४ रंगात) | ७'' x १४'' | ०.७० |
| ९. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| १०. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ११. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.७० |
| १२. | चेहरा फोटो (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०.३० |
| १३. | पालखी (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.७० |
| १४. | दगडावर बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४'' x २०'' | २.१० |

सर्व फोटोंकरिता पॅकिंग व पोस्टेजचा दर रु. ९.०० आहे.

# श्री साईंच्या पादुका केवळ शिरडी येथेच !



आज-काल बाबांच्या नावावर असंख्य ठिकाणी पादुका दिसतात. या पादुका म्हणजे नुसत्या पादुकांच्या प्रतिमा असतात. त्या बाबांनी वापरल्या असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नसतो. तरीही त्या प्रतिमांच्या दर्शनासाठी हजारो भाविक गर्दी करतात. हा त्या पादुकाप्रतिमांचा प्रभाव नसून सामान्य माणसाच्या मनातील बाबांविषयीच्या श्रद्धेचा प्रभाव असतो. श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाने एका ठरावाद्वारे सर्व भाविकांना सूचित केलेले आहे की, श्री साईबाबांनी वापरलेल्या प्रत्यक्ष पादुका शिरडी येथे समाधीमंदिरातच असून तशा पादुका अन्यत्र कुठेही नाहीत, याची भाविकांनी कृपया नोंद घ्यावी.


रघुपति राघव राजाराम।
पतित पा साईनाम॥

वी शताब्दी निमित्त On the occassion of 7th Centenary

Registered with the Registrar
of News-papers of India
No. MH/527

संत ज्ञानेश्वर (इ.स. १२७४ – १२९६)

